II आ नो भद्रः क्रतवो: यन्तु विश्वतः II

ADARSH VIDYA PRASARAK SANSTHA'S

**ADARSH COLLEGE OF ARTS, COMMERCE & SCIENCE**

Near KBMC office, Kulgaon-Badlapur, Tal. Ambarnath Dist. Thane 421503

Permanently Affiliated to University of Mumbai & Recognized under 2(f) &12B of UGC Act, 1956

NAAC Re-Accredited "B++" Grade (2017-2022), IMC-RBNQA Certified-2019, ISO 9001-2015

www.adarshcollege.avpskulgaon.net, adarshcollege@rediffmail.com, 0251-2691819, 9309081149

## ग्रंथालय विभाग

## ग्रंथप्रदर्शन व Selfie With Book अहवाल

१२ ऑगस्ट ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय ग्रंथपाल दिन' म्हणून साजरा केला जातो, याचे औचित्य साधून आदर्श कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने सोमवार दिनांक १२ ऑगस्ट २०२४ रोजी ग्रंथालयाच्या वतीने चरित्रात्मक पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

प्रदर्शनाचे उद्घाटन आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे विश्वस्त मा. श्री. नंदकिशोर (राम) पातकर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनाप्रसंगी आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. उदय कोतवाल, महाविद्यालय नियामक मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. उदय केळकर, महाविद्यालयाच्या प्र-प्राचार्या डॉ. संगीता पांडे, ग्रंथपाल श्री. लक्ष्मीकांत सातपुते, विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

प्रदर्शनात सामाजिक, स्वातंत्र्यवीर क्रांतिकारी, शैक्षणिक, सहकार आणि अर्थतज्ज्ञ अश्या विविध क्षेत्रातील व्यक्तींचे चरित्र व आत्मचरित्र असलेल्या ग्रंथांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. या प्रदर्शनाच्या माध्यमातून ग्रंथालयात चरित्रात्मक उपलब्ध असणाऱ्या ग्रंथाबाबत माहिती मिळावी या दृष्टिकोनातून ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

ग्रंथ प्रदर्शनात भेट देणाऱ्या वाचकांसाठी Selfie with Book हि संकल्पना राबविण्यात आली होती. या करीता ग्रंथालयात Selfie with Book साठी स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आला होता. या Selfie with Book च्या माध्यमातून वाचकास आवडणाऱ्या पुस्तकासोबत Selfie फोटो काढण्यात आले. त्यामुळे वाचकाची आवड याची माहिती मिळा-ली. यात विध्यार्थ्यांव्यतिरिक्त संस्थेचे विश्वस्त यांनीही Selfie with Book फोटो घेतले.

या कार्यक्रमासाठी एकूण २०० विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी भेट दिली. तसेच १५० विध्यार्थ्यांनी Selfie With Book येथे फोटो काढले. ग्रंथपाल श्री. लक्ष्मीकांत सातपुते यांनी उपस्थित मान्यवरांचे तसेच मा. प्र - प्राचार्यांचे आभार मानले.

ग्रंथपाल

प्र - प्राचार्या